# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

ASSTT. COMMISSIONER OF POLICE, ANTI-CORRUPTION BUREAU, MUMBAI

1. राज्य State महाराष्ट्र जिल्हा District मुंबई पोलीस ठाणे Police Station ला. प्र. वि. पहिली खबर क्र. FIR No. 10 वर्ष Year 2026 दिनांक Date 24/04/2026

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलमे Sections 7

   (ii) अधिनियम Act ............ कलमे Sections ............

   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ............

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day शनिवार तारीख पासून Date from 24/4/26 वेळ Time ............ तारीख पर्यंत Date to 24/4/26 वेळ Time 12:40

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.०० (2) ०३.०० ते ०६.०० (3) ०६.०० ते ०९.०० (4) ०९.०० ते १२.०० (5) १२.०० ते १५.००

(6) १५.०० ते १८.०० (7) १८.०० ते २१.०० (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 18/03/2026 वेळ Time 18:00

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 32 तारीख Date 24/04/2026 वेळ Time 21:14

4. माहितीचा प्रकार Type of Information लेखी लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ............ चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ............
Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O. P. Name and No.

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name घाटकोपर मेट्रो स्टेशन खाली, घाटकोपर पोस्ट ऑफिस पश्चिम समोरील ठिकाणाचे नंबर No. if any ............ गल्ली Ward ............ रस्त्याचे नाव Name of road रोडवर, घाटकोपर (प.) मुंबई.

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ............ गाव Village ............ पोस्ट Post ............ तालुका Taluka ............ जिल्हा Dist. ............ राज्य State ............

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ............ तालुका Taluka ............ जिल्हा Dist. ............ राज्य State ............

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name जगदिश वसंत मोरे (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name वसंत मोरे

(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 36 वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality ............ फोन नं. Phone No. 8286869133

(e) पारपत्र क्रमांक Passport No. ............ दिल्याचा दिनांक Date of issue ............ दिल्याचे ठिकाण Place of Issue ............ (f) व्यवसाय Occupation नोकरी

(g) धर्म Religion हिंदु जात Caste मराठा जनजात Sub-Caste ............

(h) पत्ता Address ............ गल्ली/सर्व्हे नं. Ward ............ घर/नाव नं. House Name No. ............ फोन/मो. नं. Phone No. ............ पॅन नं. Pan No. ............ वोटर्स नं. Card No. ............

रस्त्याचे नाव Road ............ जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ............ गाव Village ............ पोस्ट Post ............ पो. स्टे. P. Stn. ............

नेमणूक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

तालुका Taluka ............ जिल्हा Dist. ............ राज्य State ............ सध्याचा पत्ता Present Address ............

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

श्री. सतिश गोरख राठोड, वय 32 वर्षे, पद पोलीस शिपाई ब.क्र. 141053, नेमणूक घाटकोपर वाहतूक शाखा, मुंबई, रा.ठी. रूम.नं.१०८ नवघर पाडा, दुर्गा नगर, उल्हास नगर, ठाणे.

(G.C.P.) K 1043 (A) (1000–1-2025)

Scanned with OKEN Scanner

## फिर्याद

मी जगदिश वसंत मोरे वय 36 वर्षे, पद पोलीस निरीक्षक नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई असुन माझी ही सविस्तर फिर्याद स्वतंत्र कागदावर टंकलिखीत करण्यात आली असुन तीच फिर्याद गुन्ह्याची प्रथम खबरी अहवाल म्हणुन संबोधण्यात यावी.

समक्ष

(मच्छिंद्र दिवे)
सहा. पोलीस आयुक्त
ला. प्र. वि. मुंबई

Scanned with OKEN Scanner

फिर्याद दिनांक २५/०४/२०२६

मी, जगदीश वसंत मोरे, वय ३६ वर्षे, व्यवसाय : नोकरी (पोलीस निरीक्षक), नेमणुक - लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, मुंबई, मोबाईल नंबर ९७६७७८१०३३.

----------

मी वरील प्रमाणे असून, दिनाक ०४/०९/२०२५ पासून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे पोलीस निरीक्षक या पदावर नेमणुकीस आहे.

मी दिनांक १८/०३/२०२६ रोजी कार्यालयात कर्तव्यावर हजर असताना, मा. अपर पोलीस आयुक्त, ला.प्र.वि. मुंबई यांचेकडील पडताळणी कारवाई क्रमांक १७/२०२६ मध्ये तपासी अधिकारी म्हणून माझी व पर्यवेक्षण अधिकारी म्हणुन सहाय्यक पोलीस आयुक्त, श्री.मच्छिंद्र दिवे यांची नेमणुक केल्याबाबत आदेश मिळाल्याने नमुद पडताळणी मधील तक्रारदार वजाहत अली बहादुर खान यांचेकडे त्यांच्या लेखी तक्रारीच्या अनुषंगाने चर्चा केली. तेव्हा तक्रारदार वजाहत अली बहादुर खान, वय-३३, रा.ठि.मिलिंद नगर हिमालया सोसायटी, घाटकोपर (वेस्ट) झोपडपट्टी ,मुंबई ४०००१४. मोबाईल. ८७७९११८५८२ यांनी विशाल बाळू गायकवाड यांचे मालकीची ऑटो रिक्षा क्र. MH03 DC 6747 ही अग्रीमेंट करून चालवयाला घेतली आहे. सदर रिक्षा तक्रारदार हे घाटकोपर वेस्ट एरिया मध्ये चालवुन कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवतात.नमुद तक्रारीतील लोकसेवक हे ट्रॅफिक ऑफिस गांधीनगर, विक्रोळी वेस्ट येथील पोलिस कांस्टेबल श्री.सतिश राठोड मोबाईल नं. ९१३०१५२०८० हे तक्रारदार व सोबतच्या ईतर १५ रिक्षाचा धंदा व्यवस्थीत चालू ठेवण्यासाठी व रिक्षावर चालान दंड न करण्यासाठी हफ्ता १५०० ते २००० रु. लाचेची मागणी करतात. सर्वांकडुन जमा करून त्यांचे व ईतर पॉईट वरील पोलीसांचे दिवसाचे १०० ते २०० रु ची व हफ्ता १५०० ते २००० रु. मागणी करतात. तक्रारदार यांची मर्जी नसताना त्यांनी नमूद लोकसवेक यांना मागच्या हफ्त्याचे लाच १५०० रु. दिले आहेत. व चालू हफ्त्याचे देखील तक्रारदार यांच्याकडे पैसे लोकसेवक श्री.राठोड मागत आहेत. तक्रारदार यांना पैसे देण्याची इच्छा नाही. परंतु लोकसेवक श्री. सतिश राठोड सुट्टीवर गेले असल्याने ते परत येताच तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ऑफिसला कळवितो याबाबतची स्व:हस्ताक्षरात लेखी तक्रार दिनांक १८/०३/२०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई या कार्यालयात केली आहे.

तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने पुढील कारवाईकरीता शासकीय पंचांची आवश्यकता असल्याने प्रभारी अंमलदार पो.ह. कावले यांच्यामार्फतीने दोन शासकीय पंच नामे १) श्री. सय्यद खय्युम शमशुददीन ,वय -३५,व्यवसाय -नोकरी,लिपिक टंकलेखक,कामगार आयुक्त कार्यालय,वांद्रे,मुंबई पूर्व ,रा.ठि.इमारत क्र. ४ ए,फ्लॅट क्र.२२१२,बॉम्बे डायिंग मिल,म्हाडा कॉलनी,भोईवाडा,नायगाव,दादर,पूर्व,मुंबई -४०००१४. २) श्री.कैलास ग्यानिराम रहांगडाले, वय -४२,व्यवसाय -नोकरी, परिरक्षण भूमापक, नगर भूमापण अधिकारी वांद्रे,मुंबई कार्यालय, रा.ठि. राजवैभव पार्क,रुम क्र.३०३, ए व्हिंग,महागणपती हॉस्पीटल जवळ,टिटवाळा पूर्व-४२१६०५ यांना पाचारण केले. दोन्ही पंच कार्यालयात हजर झाल्यानंतर आम्ही त्यांना तक्रारदार श्री. वजाहत अली बहादुर खान यांच्या तक्रारीविषयी थोडक्यात हकिगत सांगून, तक्रारदार यांचा तक्रारी अर्ज पंचाना वाचण्यास दिला. पंचांचा तक्रारी अर्ज वाचून झाल्यानंतर त्यावर समक्ष म्हणून आम्ही तसेच दोन्ही पंचानी स्वाक्षरी करून सदरचा अर्ज आमचे ताब्यात घेतला.

तदनंतर तक्रारदार यांनी आम्हाला फोनद्वारे कळविले कि,लोकसेकांनी तक्रारदारस भेटण्यास उदया दिनांक २४/०४/२०२६ रोजी बोलाविले आहे,अशी माहिती दिल्याने आम्ही तक्रारदारास पडताळणी कारवाईबाबत सुचना देवून पडताळणी कारवाईचे नियोजन केले. त्यानंतर आम्ही दिनांक २४/०४/२०२६ रोजी १०.४० वा. लाप्रवि कार्यालयातून पडताळणी कारवाईकरीता बाहेर पडलो. पडताळणी पंचनामा कामी मी,सपोआ दिवे,पचं क्र १ व पंच क्र २,पोशिक्र.०९०९९९/विशाल मिंढे असे

Scanned with OKEN Scanner

शासकीय वाहनासह रवाना होवून माणिकलाल ईस्टेट , घाटकोपर वेस्ट,मुंबई येथे पोहचलो. तक्रारदारास सदर ठिकाणी आम्ही बोलवुन घेतले असता थोडया वेळात वजाहत अली बहादुर खान हे सांगितलेल्या ठिकाणी तेथे हजर आले. सदरवेळी तांत्रिक शाखेतील पो.शि. विशाल मिंढे यांच्या मदतीने व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मायक्रो एस.डी.कार्ड टाकुन माझे, तक्रारदार व दोन्ही पंच यांचे वक्तव्य ध्वनिमुद्रीत करण्यात आले.

त्यानंतर ११.५३ वा. सपोआ दिवे यांचे सुचनेनुसार व्हाईस रेकॉर्डर चालु करून तक्रारदार वजाहत अली बहादुर खान यांना त्यांचे मोबाईल न.८७७९११८५८२ यावरून लोकसेवक श्री राठोड यांचे मोबाईल न.९१३०१५२०८० यावर फोन करण्यास सांगितले व फोन स्पीकर ठेवण्यास सांगितले. तक्रारदार वजाहत अली बहादुर खान यांनी लोकसवेकास फोन लावुन कोठे भेटावयास यायचे याबाबत विचारणा केली असता लोकसेवकांनी विदयाविहार येथे तक्रारदार वजाहत अली बहादुर यांना येण्यास सांगितले. सदरचे कॉलवरील संभाषण हे मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये पंचासमक्ष ध्वनीमुद्रीत केले.

तदनंतर तक्रारदार यांनी परिधान केलेल्या शर्टाच्या आतील बाजुस कोणास दिसणार नाही किंवा संशय येणार नाही अशा पध्दतीने रेकॉर्डर लावून पंच श्री सय्यद यांचेसह लोकसेवक यांना ठरलेल्या ठिकाणी भेट घेण्यासाठी तक्रारदार यांनी आणलेल्या रिक्षा क्र.एमएच ०३ डिसी ६७४७ रिक्षातून जाण्यास सांगितले व मी व्हॉईस रेकॉर्डर चालू केला.त्यावेळी वेळ १२.०० होती. सदर सुचनेवरून तक्रारदार व पंच न.०१ सय्यद खय्युम शमशुददीन, हे सदर ठिकाणावरुन रवाना झाले तेव्हा तक्रारदार हे रिक्षा चालवत होते व पंच हे रिक्षाचे मागिल सिटवर बसलेले होते.

काही वेळाने १२:४५ वा तक्रारदार , पंच श्री.सय्यद हे परत शासकीय वाहनात येवुन बसले. मी , पंच नं.२ श्री कैलास ग्यानिराम रहांगडाले यांचे समक्ष पंच न.०१ श्री सय्यद व तक्रारदार यांना सदर ठिकाणी 'काय घडले' याबाबत विचारणा केली असता,तक्रारदार यांनी सांगितले कि, तक्रारदार व पंच लोकसेवक उभे असलेल्या आरईएक्स ट्रेडिंग कंपनीजवळ, विदयाविहार घाटकोपर वेस्ट येथे जवळ जाताच रिक्षा रोडलगत थांबवुन पंचांना ईशारा करून रिक्षातच बसण्यास सांगितले सांगितले.परंतु पंच क्र.०१ सय्यद हे रिक्षातून उतरून तक्रारदार यांच्या मागोमाग त्यांचे संभाषण ऐकण्याकरीता गेले. सदरवेळी पंच क्र.०१ यांनी तक्रारदार लोकसेवक बोलत असल्याचे पाहिले. सदरबाबत तक्रारदार यांना विचारले असता,त्यांनी लोकसेवक हे रिक्षाचे हफ्तेमागत असलेबाबत सांगितले. लोकसेवकांनी तक्रारदार यांना १७०० रू मागणी करून उदया दिनांक २५/०४/२०२६ रोजी देण्यास सांगितले आहे.

पडताळणी कारवाईमध्ये लोकसेकाने लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने दिनांक २५/०४/२०२६ रोजी ठरल्याप्रमाणे आम्ही सापळा पथक, दोन्ही पंच लाप्रवि कार्यालयात सकाळी ०८.०० वा. हजर झालो. पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवकाने तक्रारदार यांचेकडे रूपये १७००/- लाचेची रक्कम देण्याबाबत सांगितल्याने आज रोजी लाप्रवि कार्यालयास प्रथम सर्वांचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत करून लाप्रवि कार्यालयातच सापळा पुर्व कारवाई करून सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरले. दिनांक २५/०४/२०२६ रोजीच्या सापळा कारवाईमध्ये नविन मेमरी कार्ड वापरण्यात येणार असल्याने मी पोशि मिंढे यांना सांगुन नविन मेमरी कार्ड हजर करण्यास सांगितले व सदर मेमरी कार्डमध्ये लाप्रवि कार्यालयातील गोपनिय कक्षामध्ये माझे, पंचांचे व तक्रारदार यांचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत करण्यात आले.

मी व स.पो.आ,मच्छिंद्र दिवे यांनी पंच, तक्रारदार व पथकास सापळा कारवाई दरम्यान घ्यावयाची व करावयाची कारवाईबाबत आवश्यक त्या सुचना दिल्या. मी तक्रारदार यांना लोकसेवक सतिश राठोड यांना लाचेची रक्कम दिल्यानंतर इशारा म्हणून सापळा पथकास दिसेल अशाप्रकारे वारंवार दोन्ही हात वर करून आळस देण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना लाचेच्या

Scanned with OKEN Scanner

रक्कमे बाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी त्यांचेकडील बचतीतील रुपये १०००/- इतकी रक्कम घेवुन आल्याचे सांगितले. तक्रारदार यांचेकडील उपलब्ध लाचेची रक्कम रू. १०००/- (त्यामध्ये रू. ५००/- दराच्या भारतीय चलनाच्या ०२ नोटा) यांच्या झेरॉक्स काढण्यात आल्या आहेत. तसेच उर्वरित ५००/- दराची एक व १००/- दराच्या दोन खोटया चलनी नोटा वापरण्यात आल्या आहेत. त्यानंतर पोहक्र.०६.१५६२/जगदीश सोनोने यांनी पंच व तक्रारदार यांना ॲन्थ्रोसिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगून ॲन्थ्रोसिन पावडरचा डेमो दाखविला त्यामध्ये पावडरचा रंग फिकट निळसर चकाकी दिसून आली.

त्यानंतर पोह. सोनोने हे सापळा कारवाईमध्ये भाग घेणार नसल्याने त्यांचे दैनंदिन काम करण्याकरीता निघून गेले. त्यानंतर मी, सपोआ दिवे, दोन्ही पंच, तक्रारदार व पथकातील अंमलदार सापळा कारवाईकरीता आवश्यकत्या साधन सामुग्रीसह दोन शासकिय वाहनाने १०.४५ वा. लाप्रवि कार्यालयातून बाहेर पडलो. मी शासकीय वाहन चालक कदम व वाहन चालक न.प्र.वि.पो.शि क्र. ४७९/संकेत कुभार यांना दोन्ही वाहने माणिकलाल ईस्टेट , घाटकोपर वेस्ट,मुंबई येथे घेण्यास सांगितली. ११.३० वा. आम्ही सर्व माणिकलाल ईस्टेट , घाटकोपर वेस्ट,मुंबई येथे आलो.

त्यानंतर सपोआ दिवे यांचे सुचनेनुसार व्हाईस रेकॉर्डर चालु करून तक्रारदार वजाहत अली बहादुर खान यांना त्यांचे मोबाईल न.८७७९११८५८२ यावरुन लोकसेवक श्री सतिश राठोड यांचे मोबाईल न.९१३०१५२०८० यावर फोन करण्यास सांगितले व फोन स्पीकरवर ठेवण्यास सांगितले. तक्रारदार वजाहत अली बहादुर खान यांनी लोकसवेकास फोन लावुन कोठे भेटावयास यायचे याबाबत विचारणा केली असता लोकसेवकांनी घाटकोपर मेट्रो स्टेशन ब्रीजच्या खाली तक्रारदार वजाहत अली बहादुर यांना येण्यास सांगितले. सदरचे कॉलवरील संभाषण हे मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये पंचासमक्ष ध्वनीमुद्रीत केले.त्यावेळी १२.०३ वाजले होते. पो.शि.चा.१९५७२/संतोष कदम यांनी लाच म्हणून वापरण्यात येणाऱ्या रूपये १७००/- रक्कमेतील नोटांना ॲन्थ्रोसिन पावडर लावून ती लाचेची रक्कम तक्रारदार यांनी परिधान केलेल्या खाकी शर्टाच्या उजव्या बाजूच्या खिशामध्ये ठेवले.

तदनंतर तक्रारदार यांनी परिधान केलेल्या शर्टाच्या आतील बाजुस कोणास दिसणार नाही किंवा संशय येणार नाही अशा पध्दतीने रेकॉर्डर लावून पंच श्री सय्यद व इतर पोलीस अमलदार यांचेसह लोकसेवक यांना ठरलेल्या ठिकाणी भेट घेण्यासाठी तक्रारदार यांनी आणलेल्या रिक्षा क्र.एमएच ०३ डिसी ६७४७ रिक्षातून जाण्यास सांगितले व मी व्हॉईस रेकॉर्डर चालू केला. त्यावेळी वेळ १२.१३ होती. सदर सुचनेवरून तक्रारदार व पंच न.०१ सय्यद खय्युम शमशुददीन, पोशिक्र.०८११३४/गणेश पांढुरंग सोनावणे,पोशिक्र.०९०९९९/विशाल मिंढे, पोशिक्र. ११३५१७/रेडेकर हे सदर ठिकाणावरून रवाना झाले तेव्हा तक्रारदार हे रिक्षा चालवत होते व पंच,इतर पोलीस कर्मचारी हे रिक्षाचे मागिल सिटवर बसलेले होते. त्यानंतर मी, सपोआ दिवे व इतर सापळा पथक हे खाजगी रिक्षाने घाटकोपर मेट्रो स्टेशन पश्चिम येथे येवून परिसरात पाळत ठेवून होतो.

तदनंतर तक्रारदार हे पंचासमक्ष लोकसेवक सतिश राठोड यांना घाटकोपर मेट्रो स्टेशन ब्रीजखाली भेटण्यास गेले. सदर ठिकाणी लोकसेवक सतिश राठोड हे वाहतूक विभागाच्या पोलीस शासकीय युनिफॉर्म मध्ये शासकीय दुचाकी वाहन एमएच ०१ एफ एच ३०८३ पल्सर कारवाईकरीता उभे होते. तक्रारदार व लोकसेवक सतिश राठोड यांच्यामध्ये संवाद होउन लोकसेवक यांनी लाचेची रक्कम लोकसेकाचे मोबाईलचे कव्हर मध्ये टाकण्यास सांगून मोबाईल तक्रारदार यांना दिला. तक्रारदार हे घटनास्थळाजवळील मेट्रो स्टेशनब्रीजच्या खालील एका पिलरच्या मागे जावून लोकसेवक यांच्या मोबाईलच्या प्लॅस्टीक कव्हरच्या आतमध्ये लाच रक्कम ठेवली व त्यानंतर सदर तक्रारदार यांनी पंचासमक्ष लोकसेवक यांचा मोबाईल लाच रक्कमेसह लोकसेवक यांना दिला.त्यानंतर तक्रारदाराने सापळा पथकास दिसेल अशाप्रकारे लोकसेवकाने लाचेची रक्कम स्विकारल्याबाबत पुर्व नियोजीत

Scanned with OKEN Scanner

इशारा केला. त्यानंतर लगेच मी सपोआ दिवे, व सापळा पथकाने पंचासमक्ष लोकसेवक सतिश राठोड यास १२.५० वा. लाचेच्या रक्कमेसह रंगेहाथ पकडले. सदर लोकसेवक सतिश राठोड यांना त्याचे पूर्ण नाव व पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव श्री.सतिश गणेश राठोड,वय - ३२ पद - पो.शि.क्र. १४१०५३/घाटकोपर वाहतूक विभाग,मुंबई राठी : रुम नं.१०,खानकर पाडा, दुर्गा नगर,एम.के. शाळेजवळ,कल्याण (पश्चिम) ठाणे जिल्हा.- ४२१३०१ असे सांगितले. त्यानंतर घाटकोपर मेट्रो स्टेशन जवळील असलेल्या घाटकोपर पश्चिम उपडाकघर मध्ये आरोपीची अंगझडती,अंथ्रोसीन पावडर गुणधर्म तपासून आरोपी लोकसेकाकडून लाच रक्कम रूपये १७००/- पंचासमक्ष हस्तगत करण्यात आली. लाच रकमेवर व आरोपीताचे हातावर अंथ्रोसीन पावडरची फिकट निळसर चकाकी दिसून आली. सदरबाबतची व्हिडिओ चित्रीकरण करण्यात आले.उर्वरीत कार्यवाहीकरीता आम्ही सर्व ताब्यात घेतलेल्या अंगझडतीतील चिजवस्तू व लोकसेवक सतिश राठोड यांचे सह लाप्रवि कार्यालयात परत आलो व सापळा कारवाईबाबत सविस्तर पंचनामा केला.

तक्रारदार वजाहत अली बहादुर खान हे घाटकोपर वेस्ट परिसरात रिक्षा चालवत असून वजाहत अली व इतर रिक्षाचालक यांचे रिक्षाचा व्यवसाय व्यवस्थित चालू ठेवण्यासाठी व त्यांच्या रिक्षावर चालाण दंड न मारण्यासाठी सर्वांचे मिळून तडजोडीअंती हफ्ता १७००/- रूपये लाच रकमेची मागणी यातील लोकसेवक सतिश राठोड यांनी दिनांक २४/०४/२०२६ रोजी केल्याचे पडताळणी पंचनाम्यामध्ये निष्पन्न झाल्याने दिनांक २५/०४/२०२६ रोजी सापळा कारवाई आयोजित केली असता, लोकसेवक सतिश राठोड यांनी तक्रारदार वजाहत अली यांचेकडून लाच रक्कम १७००/- स्विकारल्याने त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले. म्हणुन माझी त्यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ अन्वये कायदेशीर फिर्याद आहे.

समक्ष,

(मच्छिंद्र गिरज़ाबा दिवे)
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

जगदीश मोरे

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे तात्काळ

Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..................

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..................

Unnatural / Accidental Death Case No., if any.

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमूद तारीख वेळी व ठिकाणी यातील तक्रारदार वजाहत अली बहादुर खान हे घाटकोपर वेस्ट परिसरात रिक्षा चालवतात. वजाहत अली व इतर रिक्षाचालक यांचे रिक्षाचा व्यवसाय व्यवस्थीत चालु ठेवण्यासाठी व त्यांचे रिक्षावर चालान दंड न मारण्यासाठी सर्वांचे मिळुन तडजोडीअंती हप्ता १६००/- रु. लाच रकमेची मागणी यातील आलोसे सतिश रोडे यांनी दि. २४/४/२०२५ रोजी केल्याचे पडताळणी पंचनामामध्ये निष्पन्न झाल्याने दि. २५/४/२०२५ रोजी सापळा कारवाई आयोजित केली असता, आलोसे यांनी वजाहत अली यांचेकडुन लाच रक्कम १६००/- रु. स्विकारल्याने त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले म्हणुन गुन्हा नोंद

13. **केलेली कार्यवाही** –1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : संजय विश्वनाथ शिंदे पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. मुंबई

**2.** तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .................. जिल्हा .......... राज्य ..........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) .............. Rank .............. No. ............ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ..................

(3) Transferred to P. S. ..................

District .................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.
(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant/Informant

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name मच्छिंद्र गिरजाबा दिवे

पदनाम Rank सहायक पोलीस आयुक्त

तपासिक अ. चा कोड क्र.

Posting ला. प्र. वि. मुंबई.

Code No. of I. O. ..................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ..................

1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत | 2 फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक ( संगणक ), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of First Information Report

ASSTT. COMMISSIONER OF POLICE ANTI-CORRUPTION BUREAU सत्यमेव जयते MUMBAI

Scanned with OKEN Scanner